# २०१७ चे एकरूप परिनियम क्रमांक ३

(प्रकाशन दिनांक - १७ मे २०१७)

## पदवीधरांच्या नोंदवहीतून नाव काढून टाकणे

संदर्भ - म.सा.वि.अ., २०१६ - कलम १३४ (२)

# UNIFORM STATUTE No. 3 OF 2017

(Publication Date - 17 May 2017)

## Removal of Name from Register of Graduates

Ref - M.P.U.A., 2016 - Section 134 (2)

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ मे २०१७

## अधिसूचना

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.**

क्रमांक संकीर्ण २०१६/प्र.क्र. ३४७/कार्या-विशि-३.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. अधि. क्र. ६) याच्या कलम ७२ चे पोट-कलम (१०) आणि कलम १३५ याद्वारे, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, पदवीधरांच्या नोंदवहीतून नाव काढून टाकण्याशी संबंधित एकरूप परिनियम विहित करीत आहे :—

### सन २०१७ चे एकरूप परिनियम क्रमांक ३

**१. संक्षिप्त नाव :—** या परिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (पदवीधरांच्या नोंदवहीतून नाव काढून टाकणे) एकरूप परिनियम, २०१७ असे म्हणावे.

**२. पदवीधरांच्या नोंदवहीतून नाव काढून टाकण्याकरिता कार्यपद्धती :—**

(१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ याच्या कलम १३४ च्या पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट, केलेल्या कारणांवरून पदवीधरांच्या नोंदवहीतून एखाद्या व्यक्तीचे नाव काढून टाकता येईल.

(२) कुलसचिव, तक्रार प्राप्त झाल्यावर किंवा स्वाधिकारे, संबंधित व्यक्तीला, आपले नाव पदवीधरांच्या नोंदवहीतून का काढण्यात येऊ नये, याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावील.

(३) विद्यापीठाचा कुलसचिव, कारणे दाखवा नोटिशीमध्ये, पदवीधरांच्या नोंदवहीतून नाव काढून टाकण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यासाठीची कारणे नमूद करील आणि अशी नोटीस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीत, नोटिशीच्या उत्तरामध्ये आपले लेखी निवेदन दाखल करण्याचे संबंधित व्यक्तीला सूचित करेल.

(४) असे लेखी निवेदन प्राप्त झाल्यावर किंवा खंड (३) अन्वये, देण्यात आलेल्या नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यावर विद्यापीठाचा कुलसचिव, संबंधित व्यक्तीला म्हणणे मांडण्याची संधी देईल आणि सुनावणीच्या वेळी त्याने केलेल्या निवेदनाची नोंद देखील करील.

(५) कुलसचिव सदर बाब शिफारशीकरिता व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवील.

(६) संबंधित व्यक्तीचे कारणे दाखवा नोटिशीस दिलेले लेखी निवेदन, कोणतेही असल्यास, आणि त्याने सुनावणीच्या वेळी केलेले आणि नोंदवण्यात आलेले निवेदन विचारात घेतल्यानंतर, व्यवस्थापन परिषदेस, तिच्या सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांच्या दोन तृतीयांशाहून कमी नसेल इतक्या बहुसंख्येने, निम्म्याहून कमी नसेल अशा आपल्या सदस्यांचा अंतर्भाव असलेल्या अशा बहुसंख्येने, पदवीधरांच्या नोंदवहीतून नाव काढून टाकण्याची शिफारस कुलगुरुकडे करता येईल.

(७) कुलगुरु, व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीवरून, त्यास योग्य वाटेल अशा कालावधीसाठी पदवीधरांच्या नोंदवहीतून व्यक्तीचे नाव काढून टाकील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सिध्दार्थ खरात,**
शासनाचे उप सचिव.